जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 20

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE

Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा निर्माण करणाऱ्या अभिनव संशोधनास जर्मन पेटंट

**कोल्हापूर, (महा न्यूज अॅण्ड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा निर्माण करणारी अभिनव बाईडरविरहित पद्धती विकसित केली आहे. या पद्धतीस जर्मन सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजेसचे संचालक तथा रसायनशास्त्रज्ञ डॉ. सागर डेळेकर यांच्यासह डॉ. क्रांतिवीर मोरे, डॉ. तुकाराम डोंगळे, भारती विद्यापीठाच्या मेकॅनिकल विभागाचे प्रमुख डॉ. सुनिल कदम, डॉ. प्रमोद कोयले, डॉ. अनंत दोडामणी (एस.जी.एम. कॉलेज, कराड), डॉ. दीपक कुंभार (ए.एस.सी. कॉलेज, इचलकरंजी) यांनी सदर संशोधन प्रक्रियेत सहभाग घेतला.

हे संशोधन सौरऊर्जा निर्मिती क्षेत्राला गती देणारे ठरेल, असा विश्वास डॉ. डेळेकर यांनी व्यक्त केला.



तयार केलेली वेगवेगळी नॅनोसंमिश्रे आणि त्यापासून तयार करावयाचे उपकरण कमीत कमी तापमानात आणि अत्यल्प वेळेमध्ये बनवता येते, तसेच ते सुलभतेने हाताळता येते. हे उपकरण तसेच ते तयार करण्याची पद्धत सौरऊर्जा क्षेत्रात काम करणाऱ्या संशोधकांसाठी उपयुक्त ठरेल, असेही ते म्हणाले.

सौरऊर्जेचे उत्पादन त्या उपकरणामध्ये वापरल्या जाणाऱ्या अनेक घटकांवर अवलंबून असते. तसेच ते उपकरण बनवण्यासाठी वापरली जाणारी पद्धतही महत्त्वाची ठरते. विद्यापीठातील संशोधकांनी वेगवेगळ्या नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा निर्माण करणारी पद्धत कमीत कमी वेळेमध्ये आणि कमी खर्चामध्ये तयार केली आहे. यामध्ये कॅडमियम सल्फाइड क्वांटम डॉट, नैसर्गिक रंग, टायटॅनियम डायऑक्साईडच्या नॅनोमूलद्रव्यांचा वापर केला आहे. या नाविन्यपूर्ण संशोधनामुळे सौर ऊर्जा क्षेत्राला नवीन चालना मिळेल.

या संशोधनाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे सर यांनी सर्व संशोधकांचे अभिनंदन केले आहे.

10 FEB 2025 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बेनेगल यांची नायिका व्यवस्थेला प्रश्न विचारणारी

## डॉ. चंद्रकांत लंगरे : शिवाजी विद्यापीठात दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ज्येष्ठ दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या समग्र चित्रपटांतून पुरुषसत्ताक व्यवस्थेला प्रश्न विचारणारी नायिका प्रखरतेने दिसते, असे प्रतिपादन ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्रांतर्गत आयोजित 'दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या चित्रपटातील महिला प्रतिमा' या दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बीजभाषक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी पुणे विद्यापीठाच्या संवादशास्त्र विभागाचे डॉ.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात बोलताना डॉ. चंद्रकांत लंगरे. सोबत अन्य मान्यवर.

विश्राम ढोले होते. यावेळी स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालक डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. चित्रपट समीक्षक सर्फराज मुल्ला यांनी मार्गदर्शन केले. अश्विनी कांबळे यांनी आभार मानले. नांदेड विद्यापीठाचे डॉ. राजेंद्र गोणारकर, एमजीएम औरंगाबाद विद्यापीठाच्या डॉ. विशाखा गारखेडकर, एफटीआयआय पुण्याचे डॉ. प्रसाद ठाकूर, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. चंद्रशेखर वानखेडे, डॉ. अंबादास भासके, डॉ. नितीन रणदिवे, विठ्ठल एडके, दिग्विजय कुंभार, रोहिणी साळुंखे, शैलेश कोरे, विजय जाधव यांच्यासह संजय घोडावत विद्यापीठ, निटवे महाविद्यालयातील पत्रकारितेचे विद्यार्थी उपस्थित होते.

### शोधनिबंध सादरीकरण

या चर्चासत्रासाठी २० शोधनिबंध आले असून, त्यांचे सादरीकरण आणि 'श्याम बेनेगल यांच्या चित्रपटांतील गाणी' या विषयावर संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या माजी प्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांचे उद्या मार्गदर्शन होणार आहे, अशी माहिती डॉ. निशा मुडे-पवार यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2025
पुढारी

# श्याम बेनेगल यांची नायिका पुरुषसत्ताक व्यवस्थेला प्रश्न विचारणारी : डॉ. लंगरे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**


ज्येष्ठ दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या समग्र चित्रपटांतून पुरुषसत्ताक व्यवस्थेला प्रश्न विचारणारी नायिका प्रखरतेने दिसते, असे प्रतिपादन ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्रांतर्गत आयोजित 'दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या चित्रपटातील महिला प्रतिमा' या चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी पुणे विद्यापीठाच्या संवादशास्त्र विभागाचे डॉ.विश्राम ढोले होते.

डॉ. लंगरे म्हणाले, बेनेगल यांच्या चित्रपटांतील महिलांच्या व्यक्तिरेखा विचार करण्यास प्रवृत्त करणाऱ्या असून स्त्री समस्या त्यांनी स्त्रियांच्याच दृष्टिकोनातून मांडल्या. या चित्रपटांतील महिला व्यक्तिरेखा आपल्या समस्यांची उत्तरे शोधणाऱ्या खऱ्या नायिका असून त्यामुळेच त्या आजच्या काळाशी सुसंगत वाटतात.

स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालक डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले. चित्रपट समीक्षक सर्फराज मुल्ला यांनी मार्गदर्शन केले. अश्विनी कांबळे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. राजेंद्र गोणारकर, डॉ. विशाखा गारखेडकर, डॉ. प्रसाद ठाकूर, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. चंद्रशेखर वानखेडे, डॉ. अंबादास भासके, डॉ. नितीन रणदिवे, रोहिणी साळुंखे, शैलेश कोरे व विजय जाधव उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2025
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागाच्या स्नेहमेळाव्यात सहभागी झालेले माजी विद्यार्थी.

# मास कम्युनिकेशनच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा उत्साहात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाने आयोजित केलेल्या माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी विद्यार्थ्यांनी माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्याचा निर्धार व्यक्त केला. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात हा कार्यक्रम झाला.

याप्रसंगी विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी २००५ पासून कोर्सची सुरुवात केल्याचे सांगितले. माजी विद्यार्थ्यांकडून त्यांनी काही अपेक्षा व्यक्त केल्या. यामध्ये त्यांनी १२ कलमी कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. त्यात माजी विद्यार्थी संघ स्थापन करणे, कार्यशाळा घेणे, सामंजस्य करार करणे, रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे, अशा विविध मुद्द्यांचा समावेश होता.

या स्नेह मेळाव्यात विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त करताना विभागातील आठवणींना उजाळा दिला. सध्या विविध माध्यम क्षेत्रात कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी आपले अनुभव सांगितले. तसेच विभागासाठी आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासन दिले.

माजी विद्यार्थ्यांचे स्वागत डॉ. सुमेधा साळुंखे यांनी केले तर आभार जयप्रकाश पाटील यांनी मानले. यावेळी बी. ए. फिल्म मेकिंग, मास कम्युनिकेशन विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2025
पुढारी



# डॉ. विवेक धूपदाळे यांची नियुक्ती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभाग प्रमुखपदी डॉ. विवेक यशवंत धूपदाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना नियुक्तीचे पत्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या आदेशानुसार देण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ संघाला राष्ट्रीय रग्बी स्पर्धेत सुवर्णपदक



भुवनेश्वर : येथील राष्ट्रीय रग्बी स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या संघासोबत प्रशिक्षक व अन्य मान्यवर.

प्रतिनिधी
भोगावती

केआयआयटी युनिव्हर्सिटी भुवनेश्वर येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ रग्बी राष्ट्रीय स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या रग्बी संघाने सात साइड प्रकारामध्ये सुवर्णपदक पटकावले.तर पंधरा साईड प्रकारात कास्यपदक प्राप्त केले.

भोगावती महाविद्यालयाच्या नेहा

■ भोगावतीच्या चार खेळाडूंचा सहभाग

पाटील, प्राची पताडे, पूजा लाड व मयुरी कदम या चार खेळाडूंनी शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करुन राष्ट्रीय स्पर्धेत मोलाची भूमिका बजावली.मुख्य प्रशिक्षक दीपक पाटील, सहाय्यक प्रशिक्षक प्रा राहुल लहाने व व्यवस्थापक सुहास वाघ यांनी चांगली कामगिरी बजावली.

# नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जेची निर्मिती

## शिवाजी विद्यापीठातील संशोधनाला जर्मन पेटंट; बाईंडरविरहित पद्धती विकसित

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा निर्माण करणारी अभिनव बाईंडरविरहित पद्धती विकसित केली आहे. या पद्धतीस जर्मन सरकारचे पेटंट मिळाले आहे.**


डॉ. सागर डेळेकर


डॉ. तुकाराम डोंगळे


डॉ. दीपक कुंभार


डॉ. प्रमोद कोयले


डॉ. सुनिल कदम


डॉ. क्रांतीवीर मोरे

विद्यापीठाच्या इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजेसचे संचालक तथा रसायनशास्त्रज्ञ डॉ. सागर डेळेकर यांच्यासह डॉ. क्रांतिवीर मोरे, तुकाराम डोंगळे, भारती विद्यापीठाच्या मेकॅनिकल विभागाचे प्रमुख डॉ. सुनील कदम, प्रमोद कोयले, डॉ. अनंत दोडामणी (एस. जी. एम. कॉलेज, कऱ्हाड), डॉ. दीपक कुंभार (ए. एस. सी. कॉलेज, इचलकरंजी) यांनी या संशोधन प्रक्रियेत सहभाग घेतला.

सौरऊर्जेचे उत्पादन त्या उपकरणामध्ये वापरल्या जाणाऱ्या अनेक घटकांवर अवलंबून असते. तसेच ते उपकरण बनवण्यासाठी वापरली जाणारी पद्धतही महत्त्वाची ठरते.

> ‘सौरऊर्जा निर्मिती क्षेत्राला हे संशोधन गती देणारे ठरेल. तयार केलेली वेगवेगळी नॅनोसंमिश्रे आणि त्यापासून तयार करावयाचे उपकरण कमीत कमी तापमानात आणि अत्यल्प वेळेमध्ये बनवता येते. तसेच ते सुलभतेने हाताळता येते. हे उपकरण तसेच ते तयार करण्याची पद्धत सौरऊर्जा क्षेत्रात काम करणाऱ्या संशोधकांसाठी उपयुक्त ठरेल.
>
> **-डॉ. सागर डेळेकर**

विद्यापीठातील संशोधकांनी वेगवेगळ्या नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा निर्माण करणारी पद्धत कमीत कमी वेळेमध्ये आणि कमी खर्चामध्ये तयार केली आहे. यामध्ये कॅडमियम सल्फाईड क्वांटम डॉट, नैसर्गिक रंग, टायटॅनियम डायऑक्साईडच्या नॅनोमूलद्रव्यांचा वापर केला आहे.

या नावीन्यपूर्ण संशोधनामुळे सौरऊर्जा क्षेत्राला नवीन चालना मिळेल. या संशोधकांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2025
तरुण भारत

# स्त्रीवादी दृष्टिकोनातून चित्रपटाचा अभ्यास होणे आवश्यक

▪ स्वामी रामानंद विद्यापीठाच्या माध्यम संकुलाचे संचालक डॉ. राजेंद्र गोणारकर यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

सर्वच चित्रपट हे स्त्रीवादी असत नाहीत, त्यामुळे स्त्रीवादी आकलन करून, महिला दृष्टीकोनातून श्याम बेनेगल यांच्या चित्रपटातील महिला व्यक्तिरेखांचा अभ्यास करणे अधिक उचित ठरेल, असे मत स्वामी रामानंद विद्यापीठाच्या माध्यम संकुलाचे संचालक डॉ. राजेंद्र गोणारवकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्राच्यावतीने आयोजित 'श्याम बेनेगल यांच्या चित्रपटातील महिला प्रतिमा' यावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राच्या संचालक डॉ. निशा मुडे-पवार होत्या. डॉ. गोणारकर म्हणाले, अनेक चित्रपट 'महिला केंद्रित असले तरीही महिला दृष्टीकोनातून चित्रपटांचा अभ्यास झाला पाहिजे. कारण कोणत्याही सामाजिक व्यवस्थेचा पहिला बळी हा महिला असतात.

पुण्यातील फिल्म इन्स्टिट्यूट डॉ. प्रसाद ठाकूर यांनी संशोधकांनी सादर केलेल्या २० संशोधन पेपरचा आढावा घेऊन मार्गदर्शन केले. डॉ. ठाकूर यांनी संशोधकांनी चित्रपटांनी पार्श्वभूमी, चित्रपट निर्मितीचे विविध घटक यावर अभ्यास केला पाहिजे, असे सांगितले.

चित्रपट समीक्षक सरताज मुल्ला म्हणाले, श्याम बेनेगल यांनी आपल्या चित्रपटातून सामाजिक चौकटीतील महिलांच्या पारंपरीक प्रतिमा व वास्तवातील स्त्री प्रतिमा मांडल्या. एमजीएम विद्यापिठाच्या डॉ. विनाथा गारखेडकर यांनी श्याम बेनेगल यांच्या अंकुर, निशांत, मंथन आणि भूमिका चित्रपटातील स्त्री प्रतिमांचा आढावा घेतला. डॉ अंजली निगवेकर यांनी श्याम बेनेगलांच्या चित्रपटातील गाणी यावर मार्गदर्शन केले. शास्त्रीय बंदिशीचा श्याम बेनेगल यांनी उत्तम वापर चित्रपटातून केल्याचे सांगितले.

10 FEB 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कमवा-शिका योजना ठरतेय 'आधारवड'

## विद्यार्थ्यांचा शेतीपासूनचा प्रवास ॲकॅडमीक कामापर्यंत : सध्या १०० विद्यार्थी व १२० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता

अहिल्या परकाळे
कोल्हापूर




'कमवा व शिका' ही योजना शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी १९६७ साली सुरू केली. पहिल्या वर्षी या योजनेत २५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवाला. २००४-२००५ पासून या योजनेतून मुलींनाही प्रवेश दिला. सध्या कमवा व शिका योजनेत १२० विद्यार्थिनींना तर १०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची क्षमता आहे. त्यापैकी १०९ विद्यार्थिनी तर ७० विद्यार्थी कार्यरत आहेत. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी घोषणा केल्याप्रमाणे कमवा व शिका योजनेचे सशक्तीकरण होईल. विद्यार्थ्यांसाठी आधारवड ठरणाऱ्या या योजनेतील विद्यार्थी संख्या वाढीबरोबर मानधन वाढ विद्यार्थ्यांच्या आनंदात भर पाडणारी आहे.

शिवाजी विद्यापीठातील कमवा व शिका या योजनेचे पहिले मानव अधीक्षक चंद्रकुमार नलगे तर पहिले अधिकृत अधीक्षक भौतिकशास्त्र विभागाचे प्रा. मुरलीधर डोंगरे होते. या योजनेतून विद्यार्थी विद्यापीठात शेती करीत होते. अतिथी विश्रामगृहापासून ते क्रीडा विभागापर्यंत ऊस लागण केली जायची. तसेच बाभुळ बनातही मिर्ची, भात, ज्वारी यासह अन्य पिकांची लागन केली जात होती. या पिकांचा वापर वसतिगृहातील मेससाठी केला जायचा. तसेच युको बँकेजवळ 'हायवे कँटीन'ही विद्यार्थी चालवत होते. यामधील मिसळ फेमस होती. आता विद्यार्थ्यांना वसतिगृहातील मेस, झेरॉक्स सेंटर आणि प्रशासकीय इमारतीतील ॲकॅडमीक कामे दिली जातात. या योजनेत काम करणारे शेकडो विद्यार्थी प्राध्यापक, संशोधक, प्रशासकीय अधिकारी झाले. याच योजनेतून शिक्षण घेणारे डॉ. एस. एम. पठाण नागपूरविद्यापीठाचे कुलगुरू, व डॉ. एस. एच. पवार, डॉ. डी वाय पाटील विद्यापीठाचे कुलगुरू झाले आहेत. यातील विद्यार्थी विद्यापीठात प्राध्यापक झाल्यामुळे याच योजनेतील वसतिगृहाचे अधीक्षकही झाले. यातून ही योजना विद्यार्थ्यांसाठी लाभदायक ठरत आहे. या योजनेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका विद्यार्थी प्रबोधिनीची स्थापना केली. या प्रबोधिनीच्या माध्यमातून डॉ. जी. पी. माळी, डॉ. नीलेश तरवाळ, प्रा. टी. के. सरगर संपादित ६५ लेखांचा आधारवड स्मृतीग्रंथ प्रकाशित झाला. तसेच भैरव कुंभार संपादित श्रमजिवी लेखसंग्रहही प्रकाशित झाला. यामध्ये या योजनेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

| कमवा व शिका योजना कार्यरत विद्यार्थी व मिळणारे मानधन | | | |
|---|---|---|---|
| विद्यार्थी संख्या | विद्यार्थीनी संख्या | प्रतिदिवस मानधन | प्रतिमहिना मानधन |
| ७० | १०९ | ९० रुपये | २७०० रुपये |

### विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधा

या योजनेत प्रतितास ३० रुपये असे दिवसाला तीन तासाचे ९० रुपये मिळतात. यातून विद्यार्थ्यांच्या राहण्याचा, जेवनाचा खर्च होतोच, परंतू २० रुपयात कोणत्याही अधिविभागात प्रवेश व ६० रुपयात परीक्षा अर्ज भरला जातो. हेल्थ सेंटरमध्ये आरोग्यविषयक सुविधा पुरवल्या जातात. विद्यार्थ्यांना वर्षभरात फक्त १० सुट्ट्या दिल्या जात असल्याने विद्यार्थी जास्तीत जास्त वेळ अभ्यास करून ध्येयापर्यंत झेप घेतात.

### महागाईच्या दुनियेत मानधन वाढवण्याची गरज

महागाईमुळे विद्यार्थ्यांना मानधनातून खर्च करणे अवघड झाले. त्यामुळे विद्यापीठ प्रशासन कमवा व शिका योजनेच्या विद्यार्थ्यांना प्रतिदिन ५० रुपये देण्याचा विचार करीत आहे. त्यात उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी कामाच्या तासाबरोबर मानधन वाढवण्याच्या सूचना दिल्यामुळे विद्यार्थी भवनला हातभार लागणार आहे. या खर्चातून मेसमधील स्वयंपाक करणारे कर्मचारी, ऑफिसमधील लिपिक, शिपाई, वॉर्डन यांचे वेतनही द्यावे लागते. त्यामुळे मानधन वाढीचा निर्णय स्वागतार्ह असेल.

- डॉ. दीपक भादले
(अधीक्षक, विद्यार्थी भवन)